[इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.]

आर. के. जीबनलता देवी ... याचिकाकर्ती

विरुद्ध

मणिपूर उच्च न्यायालयातर्फे त्यांचे महाप्रबंधक आणि इतर ... उत्तरवादी

(रिट याचिका (दिवाणी) क्रमांक १२०९/२०२१)

२४ फेब्रुवारी , २०२३

**[न्या. एम. आर. शहा आणि न्या. सी. टी. रविकुमार]**

सेवा कायदा – मणिपूर उच्च न्यायालय अधिकारी आणि कर्मचारी भरती आणि सेवा शर्ती (वर्गीकरण, नियंत्रण, अपील आणि वर्तणूक) नियम, २०२० - पदोन्नती - न कळविण्यात आलेल्या प्रतिकूल एसीआरवर भिस्त ठेवली - ची अनुज्ञेयता नाही - गृहीत धरले : न कळविण्यात आलेले प्रतिकूल ए सी आर "चांगल्या" शेऱ्यासह असूनसुद्धा जे पदोन्नतीच्या पात्रतेच्या संदर्भात प्रतिकूल म्हणावे लागतील आणि म्हणून अशा परिस्थितीत पदोन्नतीचा विचार करताना त्यावर भिस्त ठेवण्यात येऊ नये. प्रस्तुत प्रकरणात, २०१६-१७ आणि २०१९-२० या वर्षांसाठीच्या न कळविण्यात ए सी आर कडे दुर्लक्ष करून आणि २०१७-१८ आणि २०१८-१९ या वर्षांसाठीचा ए सी आर ज्यात

याचिकाकर्ती हिला "खूप चांगली" अशी प्रतिवारी होती ते विचारात घेऊन, दिनांक ०९.०४.२०२१ रोजी सहाय्यक प्रबंधक पदावर पदोन्नतीसाठी याचिकाकर्ती हिच्या केसचा नव्याने विचार करणे आवश्यक आहे – सहाय्यक प्रबंधक पदासाठी याचिकाकर्ती हिला पदोन्नती नाकारणारी 'डीपीसी' ची दिनांक ०९.०४.२०२१ ची कार्यवाही याद्वारे रद्दबातल करून खारीज केली आहे – भारतीय राज्यघटना – अनुछेद ३२ - गुवाहाटी उच्च न्यायालय सेवा नियम, १९६७.

**रिट याचिकेला अनुमती देताना, या न्यायालयाने सांगितले : १.१ प्रस्तुत प्रकरणात वाद हा मणिपूर उच्च न्यायालयातील सहायक प्रबंधक पदाबाबत आहे. नियम २०२० पूर्वी, सहायक प्रबंधक पदावरील पदोन्नती हि गुवाहाटी उच्च न्यायालय सेवा नियम, १९६७ द्वारे शासित होती. तथापि, मणिपूर उच्च न्यायालयाने स्वतःचे असे म्हणून नियम, २०२० तयार केले. सहाय्यक प्रबंधक हे पद भरण्यासाठी, दिनांक ०९.०४.२०२१ रोजी डीपीसी यांची बैठक झाली. त्यामुळे, डीपीसीची बैठक झाली त्या वेळी प्रचलित असलेले नियम, २०२० यांचा विचार केला गेला होता, हे योग्यच होते. सहाय्यक प्रबंधक या पदावर पदोन्नतीसाठी डीपीसीच्या तारखेपासून चार वर्षांपूर्वीचे ए सी आर विचारात घेणे आवश्यक होते यावर वाद नाही आणि त्यावर वाद होऊ शकत नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या कालावधीतील ए सी आर विचारात घेणे आवश्यक होते आणि वास्तविक पाहता विचारात घेतले होते. वर निरीक्षण केल्याप्रमाणे १०० गुणांपैकी ८० गुण हे ए सी आर मधील मूल्यमापनासाठी होते. [ परिच्छेद ६ आणि ६.३ ] [१०३-ए-सी, एफ-जी ]**

१.२ प्रस्तुत प्रकरणात याचिकाकर्ती हिला २०१६-१७ या वर्षासाठी "चांगली " प्रतिवारी मिळाली होती आणि २०१७-१८ आणि तिच्या ए सी आर मध्ये २०१८-२०१९ या वर्षांसाठी "खूप चांगली" प्रतिवारी मिळाली होती. याचिकाकर्ती हिच्या वतीने विशिष्ट प्रकरण होते ज्यात हे नाकारले गेले नाही की ए सी आर मध्ये २०१६-१७ या वर्षासाठी "चांगली " अशी असलेली प्रतिवारी हि 'डीपीसी' ची बैठक होईपर्यंत याचिकाकर्ती हिला कधीही कळविण्यात आली नव्हती. म्हणून, २०१६-१७ या वर्षासाठी "चांगली" अशी प्रतिवारी असणारे न कळविण्यात आलेले ए सी आर ह्यावर पदोन्नतीचा विचार करताना भिस्त ठेवण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे २०१९-२०२० च्या ए सी आर प्रतिवारीचा संबंध आहे, मान्य आहे की दिनांक ०८.०४.२०२१ रोजी, 'डीपीसी' ची बैठक होण्याच्या फक्त एक दिवस आधी म्हणजेच दिनांक ०९.०४.२०२१ रोजीच, याचिकाकर्ती हिला ते कळविण्यात आले होते. याचिकाकर्ती हिला २०१९-२०२० या वर्षासाठीच्या ए सी आर प्रतिवारीच्या विरोधात निवेदन करण्यासाठी १५ दिवसांचा वेळ होता. १५ दिवस पूर्ण होण्यापूर्वी, 'डीपीसी' ची बैठक दिनांक ०९.०४.२०२१ रोजी झाली आणि पदोन्नतीसाठी याचिकाकर्ती हिच्या केसचा विचार केला होता. याचिकाकर्ती हिला निवेदन करण्यासाठी दिनांक ०८.०४.२०२१ पासून १५ दिवसांचा वेळ होता. त्यामुळे एकतर डीपीसी पुढे ढकलता आली असती किंवा २०१९-२०२० या वर्षाच्या एसीआरचा विचार व्हायला नको होता आणि त्याला न कळविण्यात आलेला ए सी आर असे मानायला हवे होते. २०१६-१७ या वर्षासाठी "चांगली" अशी प्रतिवारी असलेले ए सी आर हा डीपीसीची बैठक होईपर्यंत कळविण्यात आला नव्हता, त्याकडे दुर्लक्ष केले जावे आणि/किंवा पदोन्नतीचा विचार करताना त्यावर भिस्त ठेवण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे, २०१९-२०२० या वर्षाची प्रतिवारी हि देखील वगळण्यात यावी आणि/किंवा पदोन्नतीचा विचार करताना त्यावर भिस्त

ठेवण्यात येऊ नये कारण ती दिनांक ०८.०४.२०२१ रोजी कळविण्यात आली होती आणि याचिकाकर्ती हिला निवेदन सादर करण्यासाठी १५ दिवसांचा वेळ देण्यात आला होता. निवेदन करण्यापूर्वीच दिनांक ०९.०४.२०२१ रोजी डीपीसीची बैठक झाली आणि पदोन्नतीसाठी याचिकाकर्ती हिच्या केसचा विचार केला गेला होता.

१.३ सहाय्यक प्रबंधक पदासाठी याचिकाकर्ती हिला पदोन्नती नाकारणारी 'डीपीसी' ची दिनांक ०९.०४.२०२१ ची कार्यवाही याद्वारे रद्दबातल करून खारीज करण्यात आली आहे. दिनांक ०९.०४.२०२१ रोजी म्हणजे, ज्या तारखेला कनिष्ठांना पदोन्नती देण्यात आली त्या तारखेस सहाय्यक प्रबंधक पदावर पदोन्नतीसाठी चे याचिकाकर्ती हिचे प्रकरण हे २०१६-१७ आणि २०१९-२० या वर्षांसाठीच्या न कळविण्यात आलेल्या ए सी आर कडे दुर्लक्ष करून नव्याने विचार करण्याचे निर्देश दिले आहेत आणि त्यानंतर डीपीसी/सक्षम प्राधिकरण यांनी कायद्यानुसार आणि उर्वरित वर्षांचे, म्हणजे २०१७-१८ आणि २०१८-१९ चे ए सी आर विचारात घेऊन नव्याने निर्णय घ्यावा. वरीलप्रमाणे नव्याने कार्यवाही करून याचिकाकर्त्याला सहाय्यक प्रबंधक पदावर बढती दिल्यास त्या, दिनांक ०९.०४.२०२१ - ज्या दिवशी कनिष्ठांना पदोन्नती मिळाली त्या दिवसापासून थकबाकी, सेवाज्येष्ठता आदींसह सर्व परिणामी लाभ मिळण्यास पात्र असतील. [परिच्छेद ८, ८.१] [१०५-इ -एच ]

सुखदेव सिंग वि. भारत संघ आणि इतर **(२०१३) ९ एससीसी ५६६ : [२०१३] ५ एससीआर १००४**; रुखसाना शाहीन खान वि. केंद्र सरकार आणि इतर, **(२०१८) १८ एससीसी ६४०**; देव दत्त विरुद्ध केंद्र सरकार आणि इतर, **(२००८) ८ एससीसी ७२५ : [२००८] ८ एससीआर १७४ - यावर भिस्त ठेवली .**

हिमाचल प्रदेश राज्य विरुद्ध राजकुमार, **२०२२ एससीसी ऑनलाइन एससी ६८०**; प्रभू दयाळ खंडेलवाल वि. अध्यक्ष, यूपीएससी **(२०१५) १४ एससीसी ४२७ - येथे संदर्भ.**

**<u>निर्णय विधी संदर्भ</u>**

| | | |
|---|---|---|
| **[२०१३] ५ एससीआर १००४** | **परिच्छेद ३.१** | **वर भिस्त ठेवली.** |
| **(२०१५) १४ एससीसी ४२७** | **परिच्छेद ३.१** | **येथे संदर्भ.** |
| **[२००८] ८ एससीआर १७४** | **परिच्छेद ६.४** | **वर भिस्त ठेवली.** |

दिवाणी मूळ अधिकारिता क्षेत्र : रिट याचिका (दिवाणी) क्रमांक १२०९/२०२१.

(भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये)

आर. बाला सुब्रमण्यम, वरिष्ठ वकील डेव्हिड अहोंगसंगबम, राज सिंग, कु. राजकुमारी बंजू, याचिकाकर्ती यांचेकरिता वकील.

जयदीप गुप्ता, वरिष्ठ वकील, मैबम नबाघनश्याम सिंह, अहंथम हेन्री, अहंथम रोहेन सिंह, विवेक कुमार, मोहन सिंह, विवेक कुमार सिंह, कुमार मिहीर, उत्तरवादी यांचेकारिता वकील

**न्या. एम. आर. शहा** यांच्या द्वारे या न्यायालयाचा न्यायनिर्णय पारित

१. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये केलेल्या या याचिकेद्वारे, याचिकाकर्ती हिने, दिनांक ९.४.२०२१ रोजी विभागीय पदोन्नती समिती (थोडक्यात, 'डीपीसी') यांनी तिची सहाय्यक प्रबंधक पदावर पदोन्नती नाकारली ती रद्द करण्यासाठी योग्य तो दिलासा, निर्देश किंवा आदेश देण्याची विनंती केली आहे आणि डीपीसी ची नव्याने स्थापना करण्यासाठी उत्तरवादी क्रमांक १ आणि २ यांना निर्देश देण्यात यावेत.

२. प्रस्तुत रिट याचिकेला कारणीभूत असलेली तथ्ये थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत:

याचिकाकर्ती हि १९९१ साली गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या आस्थापनेमध्ये सुरुवातीला निम्न स्तर सहाय्यक म्हणून तिच्या सेवेत रुजू झाली. त्यानंतर, १९९३ साली तिला उच्च स्तर सहाय्यक या पदावर बढती मिळाली. त्यानंतर दिनांक ५.१.२०१२ रोजी तिला गुवाहाटी उच्च न्यायालयात अधीक्षक या पदावर बढती मिळाली. असे की, त्यानंतर २०१३ साली, मणिपूर उच्च न्यायालयाची स्थापना झाली कारण ते गुवाहाटी उच्च न्यायालयापासून वेगळे झाले. संबंधित वेळी आणि मणिपूर उच्च न्यायालय अधिकारी आणि कर्मचारी भरती आणि सेवा शर्ती (वर्गीकरण, नियंत्रण, अपील आणि वर्तणूक) नियम, २०२० (यापुढे 'नियम २०२०' म्हणून उल्लेख) तयार होईपर्यंत, मणिपूर उच्च न्यायालय हे गुवाहाटी उच्च न्यायालय सेवा नियम, १९६७ (यापुढे 'नियम १९६७' म्हणून उल्लेख) लागू करत होते.

२.१ अधीक्षक पदावरून पुढील पदोन्नती सहायक प्रबंधक पदावर होती. दिनांक १.२.२०१९ रोजी सहाय्यक निबंधकाचे एक पद रिक्त झाले. ऑगस्ट २०२० पर्यंत सहाय्यक निबंधकांची चार पदे उपलब्ध होती. त्यामुळे, रिट याचिकाकर्तीच्या म्हणण्यानुसार, २०१३ साली मणिपूरच्या स्वतंत्र उच्च न्यायालयाच्या स्थापनेनंतर, कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे नियम आणि इतर सेवा शर्ती ह्या नियम, १९६७ द्वारे शासित होत्या आणि सहाय्यक प्रबंधक हे पद सेवाज्येष्ठता-सह-गुणवत्तेनुसार भरले जाणार होते आणि याचिकाकर्ती अधीक्षकांमध्ये सर्वात ज्येष्ठ असल्याने, ती सहायक प्रबंधक या पदावर पदोन्नतीसाठी पात्र होती. त्यानंतर, मणिपूर उच्च न्यायालयाने स्वतःचे नियम, २०२० तयार केले. तथापि, २०१९ च्या एका रिक्त पदासह सहाय्यक प्रबंधक (सहा पदे) पदावर पदोन्नतीसाठी आणि उर्वरित पदे जी  ऑगस्ट २०२० मध्ये येणार होती त्यावर पदोन्नतीसाठी दिनांक ९.४.२०२१ रोजी ‘डीपीसी’ स्थापन करण्यात आली होती. नियम, २०२० नुसार, मागील चार वर्षांच्या ‘ए सी आर’ (वार्षिक गोपनीय अहवाल) चा विचार करणे आवश्यक होते आणि त्यानुसार 'डीपीसी' ने २०१६ पासून च्या ज्यादिवशी 'डीपीसी' स्थापन झाली त्या तारखेपर्यंत म्हणजेच दिनांक ९.४.२०२१ पर्यंतचे ए सी आर विचारात घेतले.

२.२ 'डीपीसी' ने याचिकाकर्ती हिच्या नावाची शिफारस केली नाही आणि इतर व्यक्तींना - खाजगी उत्तरवादींना येथे पदोन्नती दिली आणि म्हणून सहाय्यक प्रबंधक पदावर पदोन्नती नाकारल्याबद्दल व्यथित होऊन, याचिकाकर्ती ने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत प्रस्तुत याचिका दाखल केली आहे .

या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की याचिकाकर्ती हिने या न्यायालयासमोर सदर रिट याचिका ही प्रकरणातील वैशिष्टपूर्ण तथ्ये आणि परिस्थिती आणि आवश्यक नियमानुसार दाखल केली आहे कारण मणिपूर उच्च न्यायालयात मुख्य न्यायमुर्तींसह तीन माननीय न्यायाधीश होते, त्यापैकी दोन हे डीपीसी चे सदस्य होते आणि एसीआर हे मुख्य न्यायमूर्तींनी विचारात घेतले आणि म्हणून प्रस्तुत रिट याचिका या न्यायालयासमोर दाखल केली आहे .

३. याचिकाकर्ती च्या वतीने उपस्थित असलेले विद्वान ज्येष्ठ वकील श्री आर. बाला सुब्रमण्यम यांनी पुढील सादरीकरण केले आहे : -

(i) की, सहाय्यक निबंधकाचे पद दिनांक १.२.२०१९ रोजी आणि आणि २०२० साली ऑगस्ट महिन्यात (४ पदे) रिक्त झाली आणि नियम, २०२० हे २०२० मध्ये डिसेंबर महिन्यात लागू झाले होते आणि त्यापूर्वी नियम, १९६७ लागू होते, जेव्हा पदे रिक्त राहिली त्या संबंधित वेळी प्रचलित असलेले नियम १९६७ लागू करणे आवश्यक होते;

(ii) की, संबंधित वेळी प्रचलित असलेल्या नियम, १९६७ अन्वये, सहायक प्रबंधक पदावरील पदोन्नती ही सेवाज्येष्ठता-सह-गुणवत्तेच्या आधारावर होती आणि याचिकाकर्ती ही अधीक्षकांच्या संवर्गातील सर्वात वरिष्ठ असल्याने सहायक प्रबंधक पदावर तिला पदोन्नती मिळायला हवी होती ;

(iii) की, नियम, १९६७ नुसार, सहाय्यक प्रबंधक पदावर पदोन्नतीसाठी मागील पाच वर्षांच्या ए सी आर  विचारात घेणे आवश्यक होते, ज्याच्या विरुद्ध, नियम २०२० लागू करताना, मागील चार वर्षांचे  ए सी आर  विचारात घेण्यात आले आहेत;

(iv) की, डीपीसी मार्गदर्शक तत्त्वांनुसार, वर्षनिहाय रिक्त पदांचा विचार करणे आवश्यक होते आणि म्हणून दिनांक  १.२.२०१९ रोजी सहाय्यक प्रबंधक हे पद रिक्त झाल्याने, त्या वर्षीची रिक्त जागा लक्षात घेता,  २०१९ सालीचा सहाय्यक निबंधकाचे पदोन्नतीसाठी डीपीसी ची स्थापना करणे आवश्यक होते आणि कोणत्याही परिस्थितीत जेव्हा केव्हा डीपीसीची बैठक झाली तेव्हा, दिनांक १.२.२०१९ रोजी सहाय्यक निबंधकाचे एक पद रिक्त होते हे लक्षात घेऊन नियम, १९६७ लागू करायला हवे होते;

(v) की, नियम, २०२० अंतर्गत, अधिक उमेदवार पात्र होतात ज्यामुळे याचिकाकर्ती च्या पदोन्नतीवर विपरित परिणाम होतो कारण नियम, २०२० लागू केल्यामुळे तिला अधिक लोकांशी स्पर्धा करणे आवश्यक होते;

(vi)  की, ए सी आर २०१६-१७ साठी "चांगले" प्रतिवारी आहे हे  याचिकाकर्ती हिला कळवले गेले नाही आणि म्हणून 'डीपीसी'  द्वारे त्याचा विचार केला गेला नसावा;

(vii) की, ए सी आर २०१९-२०२० या वर्षासाठी  "चांगले" प्रतिवारी आहे हे याचिकाकर्ती हिला दिनांक ८.४.२०२१ रोजी कळवण्यात आले आणि याचिकाकर्ती हिला उक्त ए सी आर विरुद्ध निवेदन सादर करण्यासाठी १५ दिवसांचा वेळ दिला गेला आणि १५ दिवस पूर्ण

होण्याआधीच, दिनांक ९. ४. २०२१ रोजीच डीपीसीची बैठक झाली आणि २०१९-२०२० या वर्षासाठी "चांगली" प्रतिवारी असलेल्या ए सी आर चा विचार केला गेला आणि त्यानुसार पदोन्नतीसाठी याचिकाकर्ती हिच्या केसचा विचार केला गेला होता.

३.१ या न्यायालयाच्या **(२०१३) ९ ए सी सी ५६६ मध्ये नोंदवलेले सुखदेव सिंग विरुद्ध केंद्र सरकार आणि इतर; (२०१५) १४ ए सी सी ४२७ (परिच्छेद ७ ते ९) मध्ये नोंदवलेले प्रभु दयाल खंडेलवाल विरुद्ध यू पी एस सी अध्यक्ष; (२०१८) १८ ए सी सी ६४० मध्ये नोंदवलेले रुखसाना शाहीन खान विरुद्ध केंद्र सरकार आणि इतर** या प्रकरणांतील निर्णयांवर भिस्त ठेवून असे सादर केले आहे की 'डीपीसी' ने २०१६-१७ या वर्षासाठी चा ए सी आर (न कळविण्यात आलेला ए सी आर ) आणि २०१९-२०२० या वर्षासाठीचा ए सी आर जो तिला दिनांक ८.४.२०२१ रोजीच कळविण्यात आला होता, तो देखील विचारात घेण्यात भौतिक चूक केली होती. असे सादर केले आहे की, जर २०१६-१७ आणि २०१९-२० या दोन्ही वर्षांचे “चांगले” प्रतिवारी असलेले ए सी आर वगळले गेले, तर उर्वरित वर्षांसाठी, याचिकाकर्ती हिला “अतिशय चांगले” प्रतिवारी मिळाले होते आणि त्यामुळे याचिकाकर्ती हिला, त्यानुसार पदोन्नती मिळाली असती.

३.२ वरील म्हणणे सादर करून आणि उपरोक्त निर्णयांवर भिस्त ठेवून, अशी विनंती करण्यात आली की, 'डीपीसी' /उच्च न्यायालय ह्यांना असे निर्देश देण्यात यावेत की, २०१६-१७ या वर्षासाठीचा न कळविण्यात आलेला ए सी आर आणि २०१९-२० या वर्षासाठीचा ए सी आर हे दोन्ही ज्यामध्ये याचिकाकर्ती हिला "चांगली" अशी प्रतिवारी होती त्याकडे दुर्लक्ष करावे आणि

उर्वरित ए सी आर म्हणजेच २०१७-१८ आणि २०१८-१९ या वर्षांसाठीचे एसीआर ज्यामध्ये याचिकाकर्ती हिला "खूप चांगली" अशी प्रतिवारी होती ते विचारात घेऊन पदोन्नतीसाठी याचिकाकर्ती हिच्या प्रकरणाचा विचार करावा.

४. प्रस्तुत अपीलाला विरोध करताना, उच्च न्यायालयाच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील श्री मैबाम नबाघनश्याम सिंग यांनी असे सादर केले आहे की याचिकाकर्ती हिला फक्त २०१७ ते २०१९ या वर्षासाठीच्या ए सी आर मध्ये “खूप चांगली” अशी प्रतिवारी मिळाली होती आणि २०१५ आणि २०१६ या वर्षांसाठीच्या ए सी आर मध्ये “चांगली” अशी प्रतिवारी मिळाली होती.

४.१ असे सादर केले जाते की २०१७, २०१८, २०१९ आणि २०२० या वर्षांसाठीच्या ए सी आर मधील प्रतिवारी हि याचिकाकर्ती हिला कळविण्यात आली होती आणि इतरांना दिनांक ०८.०४.२०२१ रोजी, आक्षेपित विभागीय पदोन्नती समितीच्या कार्यवाहीच्या एक दिवस आधी कळविण्यात आल्या होत्या. असे सादर केले जाते की, यामुळे असे कळविण्यात आल्यापासून १५ दिवसांच्या आत याचिकाकर्ती हिला आणि/किंवा इतर कोणत्याही उमेदवाराला उक्त प्रतिवारीच्या संदर्भात, त्यांचे निवेदन, जर काही असल्यास, ते सादर करण्यापासून वंचित ठेवले गेले नाही. असे सादर केले जाते की, वास्तविक पाहता इतर उमेदवारांनी त्यांचे म्हणणे पुढच्याच तारखेला म्हणजे दिनांक ०९.०४.२०२१ रोजी सादर केले आणि याचिकाकर्ती हिने तिचे म्हणणे सादर केले नव्हते जे ती इतर कर्मचारी/उमेदवारांसारखे सादर करू शकत होती. असे सादर केले जाते की अशा प्रकारे

प्रस्तुतच्या प्रकरणात गुणवंत उमेदवारांच्या बाजूने पदोन्नतीचे आदेश केवळ दिनांक २८.०४.२०२१ रोजी जारी करण्यात आले होते, ज्या कालावधीत याचिकाकर्ती किंवा कोणताही इतर उमेदवार, यांना प्रतिवारी संदर्भात तक्रार असल्यास त्यांचे म्हणणे सादर करू शकले असते.

४.२ असे सादर केले जाते की, दिनांक ०९.०४.२०२१ रोजी उच्च न्यायालयाच्या दोन माननीय न्यायाधीशांनी सहाय्यक निबंधकांच्या पदासाठी मुलाखती घेतल्या होत्या. ए सी आर मधील प्रतिवारी आणि अशा प्रतिवारी संदर्भात माहिती मुलाखत घेणाऱ्या माननीय न्यायाधीशांना प्रदान केली गेली नाही किंवा उपलब्ध करून दिली गेली नाही. असे सादर केले जाते की, याचिकाकर्ता आणि इतर सर्व पात्र उमेदवारांच्या मौखिक परीक्षेवर प्रभाव पडला नाही आणि ते पात्र उमेदवारांच्या ए सी आर मधील प्रतिवारी पासून स्वतंत्र होते.

४.३ आत्तापर्यंत याचिकाकर्ती हिच्या वतीने सादर करण्यात आले आहे की, २९.०१.२०१९ रोजी जागा रिक्त झाल्यामुळे सदर पद त्वरित पदोन्नतीने भरले गेले पाहिजे होते, पद रिक्त झाल्यास आणि अशा प्रकारे पद २०२० मध्ये ऑगस्ट महिन्यात रिक्त झाले आणि म्हणून संबंधित नियम - उच्च न्यायालयाचे नियम लागू करायला हवे होते. असे सादर केले जाते की पदोन्नतीने पद भरणे हे शेवटी नियोक्ता/उच्च न्यायालयाचे यांचे हातात आहे.

४.४ उच्च न्यायालयाच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील तसेच पदोन्नती झालेल्या उमेदवारांच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वरिष्ठ वकील **श्री जयदीप गुप्ता यांनी, हिमाचल प्रदेश**

**राज्य वि. राज कुमार , २०२२ ए सी सी ऑनलाइन एस सी ६८०** या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयावर भिस्त ठेवून जोरदारपणे असे सादर केले आहे की, या न्यायालयाने निरीक्षण आणि मान्य केले आहे त्याप्रमाणे, विश्वव्यापी लागू केला जाणारा असा कोणताही नियम नाही की रिक्त पदे हि उद्भवल्याच्या तारखेला अस्तित्वात असलेल्या नियमांच्या आधारे भरली जाणे आवश्यक आहे.

वरील म्हणणे सादर करून आणि वरील निर्णयांवर भिस्त ठेवून, प्रस्तुत याचिका फेटाळण्याची विनंती केली जात आहे.

५. आम्ही संबंधित पक्षकारांच्या विद्वान वकीलांचे युक्तिवाद ऐकले आहेत.

६. प्रस्तुत प्रकरणात वाद हा मणिपूर उच्च न्यायालयातील सहायक प्रबंधक पदाबाबत आहे. नियम २०२० पूर्वी, सहायक प्रबंधक पदावरील पदोन्नती हि गुवाहाटी उच्च न्यायालय सेवा नियम, १९६७ द्वारे शासित होती. तथापि, मणिपूर उच्च न्यायालयाने नियम, २०२० असे स्वतःचे नियम तयार केले. सहाय्यक प्रबंधक हे पद भरण्यासाठी, दिनांक ०९.०४.२०२१ रोजी डीपीसी यांची बैठक झाली. त्यामुळे, डीपीसीची बैठक झाली त्या वेळी प्रचलित असलेले नियम, २०२० यांचा विचार केला गेला होता, हे योग्यच होते.

६.१ नियम २०२० च्या अनुसूची ३ मधील अनुक्रमांक १२ अन्वये सहाय्यक प्रबंधक पदांवर पदोन्नती/नियुक्तीसाठी 'परीक्षा योजने' नुसार विनियमित केलेले “अधीक्षक/समतुल्य व त्यावरील पदोन्नतीचे मूल्यमापन” यानुसार विभागीय पदोन्नतीची प्रक्रिया करणे आवश्यक होते :

"१२. अधीक्षक/ समतुल्य आणि त्यावरील पदोन्नतीसाठी मूल्यांकन:

(i) ए सी आर मधील मूल्यमापन : ८० गुण

(ii) मौखिक परीक्षा / मुलाखत : २० गुण ( या पदासाठी उमेदवाराची योग्यता आणि सुसंगतता याचे मूल्यांकन करण्यासाठी)

" ६.२ अनुसूची III चे एस आय क्र. १३ नुसार, जेव्हा उमेदवारांची गुणवत्ता समान असेल तेव्हाच सेवाज्येष्ठतेच्या आधारावर पदोन्नती दिली जाईल.

६.३ सहाय्यक प्रबंधक या पदावर पदोन्नतीसाठी डीपीसीच्या तारखेपासून चार वर्षांपूर्वीचे ए सी आर विचारात घेणे आवश्यक होते यावर वाद नाही आणि त्यावर वाद होऊ शकत नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या कालावधीतील ए सी आर विचारात घेणे आवश्यक होते आणि वास्तविक पाहता विचारात घेतले होते. वर निरीक्षण केल्याप्रमाणे १०० गुणांपैकी ८० गुण हे ए सी आर मधील मूल्यमापनासाठी होते.

६.४ प्रस्तुत प्रकरणात याचिकाकर्ती हिला २०१६-१७ या वर्षासाठी "चांगली " प्रतिवारी मिळाली होती आणि २०१७-१८ आणि तिच्या ए सी आर मध्ये २०१८-२०१९ या वर्षांसाठी "खूप चांगली" प्रतिवारी मिळाली होती. याचिकाकर्ती हिच्या वतीने विशिष्ट प्रकरण होते ज्यात हे नाकारले गेले नाही की ए सी आर मध्ये २०१६-१७ या वर्षासाठी "चांगली " अशी असलेली प्रतिवारी हि 'डीपीसी' ची बैठक होईपर्यंत याचिकाकर्ती हिला कधीही कळविण्यात आली नव्हती. म्हणून, या न्यायालयाने निर्णयांच्या मालिकेत घालून दिलेल्या कायद्यानुसार, **विशेषत: रुखसाना शाहीन खान**

**(उपरोल्लिखित) सुखदेव सिंग (उपरोल्लिखित) आणि देव दत्त केंद्र सरकार आणि इतर, (२००८) ८ ए सी सी ७२५** मध्ये या न्यायालयाने निरीक्षणे आणि मान्य केल्याप्रमाणे; न कळविण्यात आलेले प्रतिकूल ए सी आर "चांगल्या" शेऱ्यासह असूनसुद्धा जे पदोन्नतीच्या पात्रतेच्या संदर्भात प्रतिकूल म्हणावे लागतील आणि म्हणून अशा परिस्थितीत पदोन्नतीचा विचार करताना त्यावर भिस्त ठेवण्यात येऊ नये.

म्हणून, २०१६-१७ या वर्षासाठी "चांगली" अशी प्रतिवारी असणारे न कळविण्यात आलेले ए सी आर ह्यावर पदोन्नतीचा विचार करता भिस्त ठेवण्यात येऊ नये.

६.५ त्याचप्रमाणे २०१९-२०२० च्या ए सी आर प्रतिवारीचा संबंध आहे, मान्य आहे की दिनांक ०८.०४.२०२१ रोजी, ‘डीपीसी' ची बैठक होण्याच्या फक्त एक दिवस आधी म्हणजेच दिनांक ०९.०४.२०२१ रोजीच, याचिकाकर्ती हिला ते कळविण्यात आले होते. याचिकाकर्ती हिला २०१९-२०२० या वर्षासाठीच्या ए सी आर प्रतिवारीच्या विरोधात निवेदन करण्यासाठी १५ दिवसांचा वेळ होता. १५ दिवस पूर्ण होण्यापूर्वी, 'डीपीसी' ची बैठक दिनांक ०९.०४.२०२१ रोजी झाली आणि पदोन्नतीसाठी याचिकाकर्ती हिच्या केसचा विचार केला होता. उच्च न्यायालयाच्या वतीने सादरीकरण केले की, इतर उमेदवार ज्यांना देखील दिनांक ०८.०४.२०२१ रोजीचा २०१९-२०२० या वर्षासाठीचा ए सी आर कळविण्यात आले होते त्यांनी दिनांक ०९.०४.२०२१ रोजी त्यांचे निवेदन सादर केले होते आणि त्यामुळे याचिकाकर्ती हिला देखील इतर उमेदवारांप्रमाणे दिनांक ०९.०४.२०२१ रोजी निवेदन सादर करता आले असते, ते येथे नाही किंवा तेथे नाही.

वस्तुस्थिती अशी आहे की, याचिकाकर्ती हिला निवेदन करण्यासाठी दिनांक ०८.०४.२०२१ पासून १५ दिवसांचा वेळ होता. त्यामुळे एकतर डीपीसी पुढे ढकलता आली असती किंवा २०१९-२०२० या वर्षाच्या एसीआरचा विचार व्हायला नको होता आणि त्याला न कळविण्यात आलेला ए सी आर असे मानायला हवे होते.

६.७ उपरोक्त चर्चेचे तात्पर्यार्थ हे असेल की, २०१६-१७ या वर्षासाठी "चांगली" अशी प्रतिवारी असलेले ए सी आर हा डीपीसीची बैठक होईपर्यंत कळविण्यात आला नव्हता, त्याकडे दुर्लक्ष केले जावे आणि/किंवा पदोन्नतीचा विचार करताना त्यावर भिस्त ठेवण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे, २०१९-२०२० या वर्षाची प्रतिवारी हि देखील वगळण्यात यावी आणि/किंवा पदोन्नतीचा विचार करताना त्यावर भिस्त ठेवण्यात येऊ नये कारण ती दिनांक ०८.०४.२०२१ रोजी कळविण्यात आली होती आणि याचिकाकर्ती हिला निवेदन सादर करण्यासाठी १५ दिवसांचा वेळ देण्यात आला होता. निवेदन करण्यापूर्वीच दिनांक ०९.०४.२०२१ रोजी डीपीसीची बैठक झाली आणि पदोन्नतीसाठी याचिकाकर्ती च्या केसचा विचार केला गेला होता.

६.८ या टप्प्यावर उच्च न्यायालयाच्या वतीने सादर केलेल्या विरोधी युक्तिवादाच्या परिच्छे २३ मधील प्रतीकथन हे लक्षात घेण्यासारखे आहे. परिच्छेद २३ मध्ये, ते खालीलप्रमाणे नमूद केले आहे:

"२३. वास्तविकता अशी आहे की, दिनांक ०९.०४.२०२१ रोजी मणिपूर उच्च न्यायालयाच्या दोन माननीय न्यायाधीशांनी सहाय्यक प्रबंधक या पदासाठी मुलाखती घेतल्या होत्या. ए सी आर मधील प्रतिवारी आणि अशा प्रतिवारी संदर्भातील माहिती मुलाखत घेणाऱ्या माननीय न्यायाधीशांना प्रदान केली गेली नव्हती किंवा उपलब्ध करून दिली गेली नव्हती. त्यामुळे, मौखिक परीक्षा किंवा याचिकाकर्ती आणि इतर सर्व पात्र उमेदवार प्रभावित झाले नव्हते आणि ते पात्र उमेदवारांच्या ए सी आर मधील प्रतिवारी पासून स्वतंत्र होते."

अशा प्रकारे, उच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, ए सी आर मधील प्रतिवारी आणि अशा प्रतिवारी संदर्भातील माहिती मुलाखत घेणाऱ्या माननीय न्यायाधीशांना प्रदान केली गेली नव्हती आणि/ किंवा उपलब्ध करून दिली गेली नव्हती. वरील गोष्टी पूर्णपणे चुकीच्या आहेत. वर नमूद आणि मान्य केल्याप्रमाणे एसीआर मधील मूल्यमापनाला ८० गुणांचे द्यायचे होते आणि त्यामुळे १०० गुणांपैकी ८० गुण असलेल्या एसीआर प्रतिवारी ज्यात गुणांचा मोठा वाटा आहे त्याचा विचार उच्च न्यायालयाने करायला हवा होता.

७. वरील बाबी लक्षात घेऊन आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, २०१६-१७ आणि २०१९-२० या वर्षांसाठीच्या न कळविण्यात ए सी आर कडे दुर्लक्ष करून दिनांक ०९.०४.२०२१ रोजी सहाय्यक प्रबंधक पदावर पदोन्नतीसाठी याचिकाकर्ती हिच्या केसचा नव्याने विचार करणे

आवश्यक आहे आणि तिच्या केसचा २०१७-१८ आणि २०१८-१९ या वर्षांसाठीचा ए सी आर ज्यासाठी याचिकाकर्ती हिला "खूप चांगली" अशी प्रतिवारी होती ते विचारात घेऊन नव्याने विचार करणे आवश्यक आहे.

८. वरील बाबींवरून आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, प्रस्तुत याचिका मंजूर करण्यात आली आहे. सहाय्यक प्रबंधक पदासाठी याचिकाकर्ती हिला पदोन्नती नाकारणारी 'डीपीसी' ची दिनांक ०९.०४.२०२१ ची कार्यवाही याद्वारे रद्दबातल करून खारीज करण्यात आली आहे. दिनांक ०९.०४.२०२१ रोजी म्हणजे, ज्या तारखेला कनिष्ठांना पदोन्नती देण्यात आली त्या तारखेस सहाय्यक प्रबंधक पदावर पदोन्नतीसाठी चे याचिकाकर्ती हिचे प्रकरण हे २०१६-१७ आणि २०१९-२० या वर्षांसाठीच्या न कळविण्यात आलेल्या ए सी आर कडे दुर्लक्ष करून नव्याने विचार करण्याचे निर्देश दिले आहेत आणि त्यानंतर डीपीसी/सक्षम प्राधिकरण यांनी कायद्यानुसार आणि उर्वरित वर्षांचे, म्हणजे २०१७-१८ आणि २०१८-१९ चे ए सी आर विचारात घेऊन नवीन निर्णय घ्यावा. आजपासून सहा आठवड्यांच्या कालावधीत ही प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

८.१ वरीलप्रमाणे नव्याने कार्यवाही करून याचिकाकर्त्याला सहाय्यक प्रबंधक पदावर बढती दिल्यास दिनांक ०९.०४.२०२१ - ज्या दिवशी कनिष्ठांना पदोन्नती मिळाली त्या दिवसापासून थकबाकी, सेवाज्येष्ठता आदींसह सर्व परिणामी लाभ मिळण्यास ती पात्र असेल, असे म्हणायला हरकत नाही.

यानुसार प्रस्तुत रीट याचिका हि वरील मर्यादेपर्यंत मंजूर केली जात आहे. खटल्याची वस्तुस्थिती आणि परिस्थिती पाहता खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

दिव्या पांडे रिट याचिका मंजूर

(सहाय्य : अभिषेक प्रताप सिंह आणि रूपांशी विरंग, एलसीआरए)

x-x-x-x

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x